# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे

## Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere

(Established by Government of Maharashtra and Governed by Dr. Babasaheb Ambedkar Technological University Act No. XXIX of 2014)

विद्याविहार, लोणेरे-रायगड ४०२ १०३ (महाराष्ट्र) Vidyavihar, Lonere - Raigad 402 103 (Maharashtra)

Tel: (02140) 275142 Student Helpline: 02140 - 275212

Website: www.dbatu.ac.in, E-mail: registrar@dbatu.ac.in

**Dr. Arvind W. Kiwelekar** — डॉ. अरविंद वा. किवळेकर

**I/c Registrar** — प्र. कुलसचिव


क्रमांक : डॉ.बाआंतंवि/शै. वि./कॅरी ऑन/२०२४-२५/1608

दिनांक : ०२/०४/२०२५

## नोटीस

(फक्त विद्यापीठ कॅम्पस विद्यार्थ्यांकरीता)

**विषय** : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांसाठी कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करणेबाबत...

**संदर्भ** : महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन आदेश क्र.संकीर्ण-२०२५/ई९७०२२०/ विशि३, मंत्रालय,मुंबई-४०००३२, दिनांक:- १० फेब्रुवारी,२०२५.

वरील विषय व संदर्भास अनुसरून शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ मध्ये विद्यापीठातील प्रवेशित प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष व चतुर्थ वर्षातील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदी खालील प्रमाणे आहेत.

**शासन आदेश :**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ५ (८१) मधील अधिकारांचा वापर करून राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांना तसेच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, अधिनियम,२०१४ मधील कलम ९४ मधील तरतुदीनुसार त्या विद्यापीठास पुढील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:

१. अ) प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या ५ व्या सत्राकरीता, व्दितीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षाच्या ७ व्या सत्राकरीता तसेच वरील वर्गात प्रवेश देण्याची पात्रता ही सम सत्र २०२३-२४ (म्हणजे उन्हाळी परीक्षा २०२३-२४) च्या परीक्षांच्या निकाला ऐवजी विषम सत्र २०२४-२५ (म्हणजे हिवाळी परीक्षा २०२४-२५) च्या निकालांवर ठरवावी.

ब) अशा प्रकारे पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या विषम (हिवाळी) व सम (उन्हाळी) सत्राच्या परीक्षा एकत्रित सम (उन्हाळी) सत्राच्या परीक्षांसोबत घेण्यात याव्यात.

क) अशा प्रकारे वरील वर्गात प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे विषय सत्राचे अभ्यासक्रम पूर्ण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल आणि यासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडे आवश्यक हमीपत्र भरून द्यावे लागेल.

२. ज्या विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता कॅरी ऑन ची सुविधा त्यांच्या विद्यार्थ्यांना यापूर्वीच दिली असेल, अशा विद्यापीठांना सदर निर्देश लागू असणार नाहीत.

३. सदर निर्देश अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये केवळ शैक्षणिक वर्ष २०२४ २५ करीता लागू राहतील व या निर्देशांचा संदर्भ पुढील वर्षामध्ये घेता येणार नाही.

विद्यापीठात शिकत असलेल्या विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त नियमानुसार कॅरी ऑन सुविधा शासनाने उपलब्ध करण्यात आलेली आहे. सवब पात्र विदयार्थ्यांनी अभ्यासक्रम विभागप्रमुख यांची आपल्या अर्जावर स्वाक्षरी घेऊन सदर शैक्षणिक विभागात सादर करावेत जेणे करुन सदर अर्जावर कार्यवाही करणे उचित होईल.

(डॉ. अ. वा किवळेकर)

प्र. कुलसचिव

कुलसचिव

डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ

लोणेरे ४०२ १०३

ता माणगांव, जि. रायगड (महाराष्ट्र)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे रायगड महाराष्ट्र

प्रत : माहितीसाठी

१. मा. शैक्षणिक अधिष्ठाता

२. सर्व विभाग प्रमुख (विद्यार्थी परिभ्रमणार्थ)

३. नोटीस बोर्ड (सुचना फलक) शैक्षणिक विभाग